भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०१/२०१७

**१) मोबाईल दुकानाचे शर्टरचा प्लायवुड तोडुन मोबाईल ,व्हाऊचर व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक १२/०१/२०१७ चे २१.१५ ते १३/०१/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी अनिल हेमराज रावल वय ३८ वर्ष, रा. पहेला हा आपले दुकान बंद करुन घरी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण मोबाईल दुकानाचे शर्टरचे वर लावलेला प्लायवुड काढुन आत प्रवेश करुन झोलो कंपनीचा ०१ मोबाईल, जिवोनी कंपनीचा मिनी मोबाईल १ नग, लाईफ विन्ड मोबाईल ७५ कंपनीचा १ नग मोबाईल, व्हिडीओकॉन डिलाईट २१ कंपनीचा १ मोबाईल, आयडीया कंपनीचे व्हाऊचर ८,०००/–रु. व नगदी ४,९००/–रु. असा एकुण ३५,३००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) टेक्नोलॅब कं. पर्जन्यमान यंत्राची चोरी . :–**

दिनांक ११/०१/२०१७ ते १२/०१/२०१७ चे रात्रदर. यातील फिर्यादी सतिश गंगाधर अकुनवार वय ४५ वर्ष मंडळ अधि. तहसिल कार्या. भंडारा रा. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा साकोली यांचे तहसिल कार्यालय भंडारा चे आवारात असलेला एक टेक्नोलॅब कं. पर्जन्यमान यंत्र लावलेले कि. २५००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन ३ ब्रास बिना पास परवाना रेतीची चोरी . :–**

दिनांक १३/०१/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी दिनेश प्रकाश गोंड वय ३४ वर्ष, तहसिलदार कार्यालय तुमसर यांनी आरोपी ट्रक चालकास ट्रक थांबविण्यास सांगीतले असता ट्रक चालकाने ट्रक न थांबविला असता आरोपी ट्रक चालाकने रेतीचा परवाना न दाखविता व आरोपी ट्रक मालक मागेहुन येवुन ट्रक चालकास अन्यत्र (ट्रकमधिल रेती) खाली करण्यास सांगुन फिर्यादीस ढकलढुकल करुन त्याचा मोबाईल फोन खाली पाडुन फिर्यादीचे शायकीय कामात अडथळा निर्माण करुन ट्रक मध्ये रेती अंदाजे ३ ब्रास १५,०००/–रु. ची चोरुन वाहतुक करित असतांनी मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पो.स्टे तुमसर येथे कलम ३५३,३७९,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अल्वयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०१/२०१७ चे ०१ चे महीण्या पुर्वी. यातील आरोपी क्र. १ ते ७ यांनी संगनमत करुन व कट रचुन पिडीत अल्पवयीन फिर्यादीला औषधोपचाराच्या बहाण्याने अजमेर (राजस्थान) येथे नेवुन आरोपी क्र. ८ सोबत बळजबरीने तीचे ईच्छे विरुध्द ती अल्पवयीन असल्याची जाणीव असतांना सुध्दा लग्न लावुन दिले यातील आरोपी क्र. ८ याने पिडीत अल्पवयीन मुलीचे ईच्छे विरुध्द तिच्याशी जबरदस्तीने लैगिक अत्याचार केल्याचे अल्पवयीन मुलीचे रिपोर्ट वरुन रेल्वे पोस्टे नागपुर येथे अप क्र. २३/१७ कलम ३७६ (२)(जे),३६३,४९६,३२३,१२०(९),३४ भांदवी,९,१०,११ बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००७ सह कलम ४,६,१० पोक्सो अॅक्ट २०१२ अन्वये ची नोंद करुन गुन्हयाची डॉयरी पोशि. चौधरी ब. नं. २८२ यांनी पोस्टे साकोली येथे आणुन पेश केल्याने पोस्टे साकोली येथे कलम ३७६ (२)(जे),३६३,४९६,३२३,१२०(९), ३४ भांदवी ,९,१०,११ बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००७ सह कलम ४,६,१० पोक्सो अॅक्ट २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गांवडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक १३/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, मोहाडी, कारधा, करडी, वरठी व पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४२ लिटर कि. २,९२०/–रू. व १ लिटर देशी दारु ८०० मिली लीटर देशी दारु कि. ५००/–रु. असा एकुण ३,४२०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.